N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** येरवडा  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0319  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/05/2019 06:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 30/04/2019

**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/04/2019

**Time From (वेळेपासून):** 10:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 22:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/05/2019  **Time (वेळ):** 05:44 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 010  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/05/2019 05:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** येरवडा पोलीस स्टेशन पुणे,येरवडा पोलीस स्टेशन पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):** येरवडा

**District(State) (जिल्हा(राज्य)):** पुणे शहर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणेश काळु वाघ

(b) **Father's Name (वडील का नाव) :** काळु वाघ

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1995  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सणसवाडी ता शिरुर जि पुणे,सणसवाडी ता शिरुर जि पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सणसवाडी ता शिरुर जि पुणे,सणसवाडी ता शिरुर जि पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8483905963

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. करिम महंमद शरिफ शेख | | वडील का नाम : महंमद शरिफ शेख | 1. जे/102 लक्ष्मीपुरम सोसायटी, प्रतिकनगर येरवडा पुणे ,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/ रु. 500/ रु.च्या 4 नोटा असे एकुण2000/रु. | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक 01/05/2019 मी श्री गणेश काळू वाघ, वय-24, धंदा-चालक, रा.ठि. सणसवाडी, नरेश्वर र रोड, ता.शिरूर, जि.पुणे.मो. क्र. 8483905963समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे कार्यालयात हजर राहुन फिर्याद देतो कीमी वरील प्रमाणे असून नमूद पत्यावर राहत आहे.माझी टाटा मजिक या कंपनीची चारचाकी असून ती मी वाघोली ते शिक्रापुर अशी चालवतो. त्यावर मिळणाया उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह चालतो.मी 06 महीन्यापूर्वी सणसवाडी येथील ओम मोबाईल शपी या दुकानाचे मालक श्री धर्मेन्द्र सिंग यांचे कडून ओपो कंपनीचा रियल मी हा सेंकेंड हँड मोबाईल रु 4500/- रोख देवून विकत घेतला. सदर मोबाईल मध्ये सध्या वोडाफोन कंपनीचे सीम कार्ड नं 7507116848 हा होता. साधारणत: एक महीन्यापूर्वी मला माझे मो.क्र 8483905963 यावर एका लड लाईन फोन वरून, येरवडा पोलीस स्टेशन येथुन हवालदार शेख बोलत असल्याचे सांगुन तुम्ही पोलीस स्टेशनला मला येऊन संध्याकाळी भेटा असे सांगितले. मी त्यांना दुसया दिवशी येतो सांगितले. मी दुसया दिवशी येरवडा पोलीस स्टेशन येथे गेलो असता मला हवालदार शेख भेटले नाहीत. दुसया दिवशी त्यांनी हवालदार शेख यांनी मला फोन करुन पुन्हा भेटण्यास बोलाविले. परंतु मी गावी असल्याने त्यांना भेटण्यास गेलो नाही. आठ दिवसांनी मी येरवडा पोलीस स्टेशन येथे गेलो असता तेथे मला हवालदार शेख भेटले. त्यांनी मला माझ्याकडे असलेल्या मोबाईलची माहीती विचारली व तो चोरीचा असुन तो मोबाईल घेऊन येण्यास सांगितले. मी त्यांना हा मोबाईल माझी पत्नी वापरत असुन तो ज्या दुकानातुन घेतला आहे त्या दुकानदारासही घेऊन येतो असे बोलुन मी घरी आलो. मी धर्मेंद्रसिंग यांच्या दुकानातुन घेतलेला ओपो कंपनीचा रियल मी हा मोबाईल घेतला व मी धर्मेंद्र सिंग यास घेऊन येरवडा पोलीस स्टेशनला हवालदार शेख यांना भेटण्यास आलो. त्यांना तो मोबाईल व धर्मेंद्रसिंग याने ज्या इसमाकडुन मोबाईल विकत घेतला होता त्याचे आधारकार्डची झेरक्स दिली. हवालदार शेख मला म्हणाले की तुम्ही चोरीचा मोबाईल विकत घेतला असुन जीचा मोबाईल चोरीस गेला आहे तीचे कानातले व वीस हजार रुपये चोरीस गेले आहेत. तुम्ही ते वीस हजार रुपये दया. मी त्यांना आम्ही चुकीचे काही केले नाही आम्ही पैसे देणार नाही. तुम्ही मोबाईल ठेवा पण माझे सीमकार्ड तरी मला दया असे म्हणालो असता त्यांनी तुम्हाला मी अटक करुन जेलमध्ये टाकेन मी तुम्हाला मदतच करत आहे तुम्हाला जर अटक नको असेल तर तुम्ही वीस हजार रुपये दया. असे म्हणाले. मी त्यांना आम्ही दोघेही गरीब आहोत पैसे देऊ शकत नाही पैसे कमी करा. त्यावेळेस त्यांनी 10,000/- रुपये दया मी तुमचे सगळे क्लीअर करुन देतो असे म्हणाले. नंतर आमच्याकडे पैसे नसल्याने मी व धर्मेंद्र त्यांना भेटण्यास गेलो नाही. त्यावेळेस शेख हवालदार मला व धर्मेंद्र सिंग यास फोन करुन तसेच व्हटस अपवर मेसेज पाठवुन धमकी देऊन पैशाची मागणी करीत होते. तसेच येरवडा पोलीस स्टेशनचे कन्स्टेबल सरोदे यांनी मला तुम्ही शेख हवालदार यांना भेटा नाहीतर मी तुम्हाला सणस वाडीतुन उचलुन घेऊन जाईन अशी धमकी दिली. धर्मेंद्र यांनी वैतागुन त्यांना दहा



Scanned by CamScanner

हजार रुपये देतो असे सांगितले असता त्यांनी त्यांच्या एसबीआय बँकेच्या करीम मोहम्मद शरीफ शेख या नावाने असलेल्या अकाऊंट नंबर 33111891236 या अकाऊट मध्ये दहा हजार रुपये जमा करण्यास सांगितले असता धर्मेंद्रसिंग यांनी या अकाऊंटवर 5000/- रुपये दिनांक 20/04/2019 रोजी जमा केले. मी त्यांना माझा मोबाईल परत करण्याबाबत विचारणा केली असता शेख हवालदार मला म्हणाले की तुझ्या मित्राने पाचच हजार रुपये दिले आहेत. तु 5000/- रुपये दे आणि सिमकार्ड आणि मोबाईल घेऊन जा असे म्हणाले. मी दिनांक 30/04/2019 रोजी त्यांना भेटण्यास येरवडा पोलीस स्टेशन येथे गेलो असता ते नाईट करुन घरी गेल्याचे तेथे असलेल्या पोलीसांनी मला सांगितले. त्यापैकी एकाने हवालदार शेख यांच्या घरी जाऊन त्यांच्या मोबाईलवर कल करुन माझे बोलणे शेख हवालदार यांच्याशी करुन दिले असता मी शेख हवालदार यांना मोबाईल व सिमकार्ड परत करण्याबाबत विनंती केली. शेख हवालदार यांनी मोबाईल मिळणार नाही पण रात्री 9/00 वाजता पोलीस स्टेशनमध्ये येऊन सिमकार्ड घेऊन जा असे सांगुन तुम्ही. तु राहीलेले 5000/- रुपये व धर्मेद्रला घेऊन ये तुझ सगळ क्लीअर करुन टाकतो असे म्हणाले. त्यांनी.पुरवणी पान नं 01 दि. 01/05/2019 रोजीची श्री वाघ यांची फिर्याद सतत चालू असे मागितलेले 5000/- रुपये ही लाच रक्कम असुन मला लाच दयावयाची नसलेने मी दिनांक 30/04/2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात तक्रार दिली. माझी तक्रारीवर कारवाईसाठी मा श्री अपर पोलीस अधीक्षक श्री बोरस्ते, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांना भेटलो. पोलीस निरीक्षक श्री राजु चव्हाण यांना त्यांचे चेंबरमध्ये बोलावुन माझे तक्रारीवर कारवाई करणे बाबत आदेशित करुन त्यांना मदतीसाठी यांनी श्रीमती प्रतिभा शेंडगे, सहायक पोलिस आयुक्त वपोलस हवालदार सुनिल शेळके, व ड्रायव्हर राऊत व सरकारी वाहन तवेरा याप्रमाणे सापळा पथक उपलब्ध करुन दिले.पोनि चव्हाण यांनी माझे तक्रारीवर कारवाईसाठी शासकीय तांत्रिक विदयालय यांचेकडुन गोपनिय कामकाजासाठी पंच साक्षिदार नामे 1) यशवंत देमनाथ कांबळे व 2) सुरेश नारायण मस्तूद यांची सेवा उपलब्ध करुन घेतली. पोनि चव्हाण यांनी आलेल्या पंचाशी माझी व सापळा पथकातील सदस्यांची ओळख दिली. पोलीस हवालरदार श्री करीम शेख यांनी मला दिनांक 30/04/2019 रोजी रात्री 9:00 वाजलेनंतर येरवडा पोलीस स्टेशन येथे भेटण्यास सांगितले असल्याने पोनि चव्हाण यांनी सापळा पथकास, पंच व मला दिनांक 30/04/2019 रोजी सायंकाळी 7/00 वाजता एसीबी कार्यालय, पुणे येथे हजर राहणेबाबत सुचना दिल्या. दिनांक 30/04/2019 रोजी सर्व सापळा पथक, पंच व मी तसेच धर्मेंद्र सिंग असे सर्वजण अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे येथे हजर झालो. पोनि चव्हाण यांनी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. मी, धर्मेंद्र सर्व सापळा पथक, दोन्ही पंच व सरकारी वाहन तवेरा व ड्रायव्हर राऊत याचे सह येरवडा करीता रवाना झालो व येरवडा पोलीस स्टेशन पासुन काही अंतरावर गोल्फ लिक सोसायटीसमोर गाडी उभी केली. व मला व्हाईसरेकर्डर लावून पंच नं.1 यशवंत कांबळे यांचे सोबत श्री करीम शेख यांचेकडे लाचेची पडताळणी करणेकामी येरवडा पोलीस स्टेशन, पुणे येथे पाठवले असता सदर ठिकाणी श्री करीम शेख यांनी मोबाईल संदर्भात बोलणी केली व हवालदार शेख यांनी मला बाहेर थांबण्यास सांगुन धर्मेंद्र यास आत घेऊन गेले. त्या दोघामध्ये काहीतरी बोलणे झाले. थोडयावेळाने धर्मेंद्र बाहेर आला व मला म्हणाला की शेख साहेबांनी जेवढे पैसे असतील तेवढे पैसे घेऊन येण्यास सांगितले आहे. तसेच धर्मेंद्र याने मला माझ्या मोबाईलचे सिम कार्ड देऊन शेख हवालदार यांनी सिमकार्ड दिले असल्याचे सांगितले. त्यांनतर आम्ही गोल्फ लिंक सोसायटी येथे सापळा पथक जेथे थांबले होते तेथे आलो. पोनि चव्हाण यांनी सापळा पथकाने माझ्यात व पोलीस हवालदार करीम शेख यांच्यात झालेले संभाषण ऐकले असता हवालदार शेख यांनी प्रत्यक्ष माझ्याकडे लाचेची मागणी केली नसल्याने पुन्हा पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे पुन्हा लाच मागणीची पडताळणी करण्यासाठी माझ्या बनियनमध्ये व्हाईस रेकर्डर लावुन शेख हवालदार यांना भेटण्यास पंच कांबळे यांचे सह येरवडा पोलीस स्टेशन येथे पाठविले. मी धर्मेंद्र यास पोलीस स्टेशन बाहेर थांबण्यास सांगितले व शेख हवालदार यांना भेटलो. त्यांनी धर्मेंद्रला घेऊन ये तो देईल मला पैसे असे म्हणाले. मी त्यांना धर्मेंद्रने पैसे दिले आहेत त्याचा विषय संपला आहे. आता माझा विषय आहे मला काय आहे ते सांगा असे मी हवालदार शेख यांना विचारले असता त्यांनी किती देणारे सांगणारे तू सांग ना, मी किती दयायचे ते सांगा असे विचारले असता त्यांनी फायनल करायच अन जायचं निघून मला वेळ नाही असे म्हणाले, मी त्यांना दोन हजार रुपये देऊका असे विचारले असता त्यांनी पटदिशी दयायचं निघून जायचं चल असे उत्तर दिले. मी त्यांना पैसे घेऊन येतो असे सांगुन बाहेर आलो व सापळा पथक जेथे थांबले आहे तेथे आलो. सापळा पथकास शेख हवालदार यांनी 2,000/- रुपये लाच मागितली असल्याचे सागितले. पोनि चव्हाण यांनी यांनी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. पोलीस हवालदार शेख यांनी लाच रक्कम रुपये 2,000/- घेऊना येण्याबाबत कळविल्याने लोकसेवक श्री शेख यांना लाच म्हणुन देणेसाठी आणलेली रोख रक्कम 2,000/- रु. सापळा पथक व पंचाचे समक्ष हजर केली. त्यात 500/- रुपये दराच्या 4 नोटा होत्या. मला अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगून नोंटाना अँन्थ्रासीन पावडर लावली व सापळापुर्व कारवाई केली. पुरवणी पान नं 02 दि. 01/05/2019 रोजीची श्री वाघ यांची फिर्याद सतत चालू असे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री शेख यांनी मला लाच रक्कम घेवुन येरवडा पोलीस स्टेशन येथे बोलावले असल्याने सदर परिसरात सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. मी लाच रक्कम घेवूनपंच यांचेसह येरवडा पोलीस स्टेशन येथे आलो. तुम्ही सर्व माझे मागोमाग आले व परीसरात पांगुन पांगुन थांबलात. श्री करीम शेख यांनी मला लाच रकमेची मागणी केली व त्यानी ती स्विकारली असताना श्री करीम शेख यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले ती वेळ रात्री 10/35 वाजताची होती.सदरवेळी श्री करीम शेख यांना सापळा पथकातील श्री राजु चव्हाण यांनी ओळख सांगुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपल नाव श्री करीम मोहम्मद शरीफ शेख वय 47, नोकरी- पोलीस हवालदार ब.न. रा.जे102, लक्ष्मी पुरम, प्रतिक नगर, येरवडा पुणे असे सांगितले.श्री शेख यांचेकडुन लाच रक्कम 2,000/- हस्तगत करण्यात आली.एकंदरीत माझी दिनांक 30/04/2019 रोजीची मुळ तक्रार त्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 30/04/2019 रोजी रोजी पंचासमक्ष करण्यात आलेली पडताळणी आणि केलेली सापळा कारवाई या दरम्यान घडलेल्या घटना, तसेच प्रत्यक्ष व ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण यावरून लोकसेवक श्री करीम मोहम्मद शरीफ शेख वय 47, नोकरी- पोलीस हवालदार ब. न. रा. जे 102, लक्ष्मी पुरम, प्रतिक नगर, येरवडा पुणे यांनी 20,000/- रुपयाची मागणी करुन स्वत:चे आर्थीक फायदयासाठी माझेकडून दिनांक 30/04/2019 रोजी रात्री 10:35 वाजणेचे सुमारास मी विकत घेतलेला सेकंड हन्ड मोबाईल चोरीचा आहे असे सांगुन माझ्यावर कारवाई न करण्याकरीता येरवडा पोलीस स्टेशन येथे 2,000/- रुपये लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द तक्रार आहे. माझी वरील फिर्याद मराठीत लपटप वर टंकलिखीत केला असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.दाखल करणार -श्री.राजु चव्हाण पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणेतपासी अंमलदार -श्री.राजु चव्हाण पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे

Scanned by CamScanner